GIPE 006

# अर्थ

स्थापना १९३५
पुनरुज्जीवन एप्रिल १९७५

अर्थसंकल्प विशेषांक

एप्रिल-जून १९८९

वर्ष १५ वे, अंक १ ला

संपादक– प्रा. कमलाकर परचुरे

## अर्थ

सामाजिक-आर्थिक अभ्यासास
प्राधान्य देणारे त्रैमासिक

संचालिका– सौ. श्यामा परचुरे

संपर्क :–

१५ वा बंगला, फर्ग्युसन कॉलेज आवार, पुणे-४
दूरध्वनी– ५२७०९.

कार्यकारी संपादक– प्राचार्य खासेराव शितोळे
सहाय्यक संपादक– प्रा. सुरेश ढमढेरे
(M.A.(MPhil.)
प्रा. नासीर शेख (M. A.)

# आर्थिक सर्वेक्षण

(वर्ष एप्रिल ८८ ते मार्च ८९)

१९८८–८९ हे वर्ष आर्थिकदृष्टया थोडे समाधान व दिलासा देणारे आहे. त्याच्या मागील दोन वर्षात म्हणजे १९८६–८७ आणि ८७–८८ या दोन वर्षात भीषण दुष्काळ आणि अवर्षण तसेच औद्योगिक क्षेत्रातही मंदीचे वातावरण यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पादनातील वाढ ही फार कमी होती. ८८–८९ ह्या बजेटपूर्व वर्षात एकूण राष्ट्रीय उत्पादनात ९ टक्के इतकी वाढ गेल्या तीन-चार वर्षात झालेली नव्हती. ८८–८९ या वर्षी मात्र कृषि उत्पादन आणि औद्योगिक उत्पादन या दोहोंतही अपेक्षित इष्टांकानुसार वाढ झाली आहे. तसे पाहिले तर ८६–८९ या तीन वर्षात कृषि आणि औद्योगिक क्षेत्रात अडचणी नव्हत्या असे नाही. तथापि नैसर्गिक तसेच नित्याच्या अडचणीवर मात करण्याचे सामर्थ्य आपल्या देशाच्या आर्थिक व्यवस्थेस प्राप्त झाले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासकांनी आपल्या अर्थव्यवस्थेची ही शक्ति समजावून घेतली पाहिजे याचे कारण १९५० पासून १९८९ पर्यंत, गेली सुमारे ४० वर्षे आपली अर्थव्यवस्थाही कृषी प्रधान असल्याने संपूर्णपणे पावसावर वा नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून आहे, असेच आपण ठामपणे मांडत आलो. त्या मानीव सिद्धांतानुसार आपण आपल्या अर्थव्यवस्थेचे अध्ययन, अध्यापन, व संशोधन करीत गेलो आणि अवर्षण आणि आर्थिक पीछेहाट यांच्यातील परस्पर संबंध हा आपण गृहीत धरून चाललो.

परंतु गेल्या पाच सहा वर्षात अर्थशास्त्रज्ञांना हे हळू हळू जाणवू लागले आहे की भारताची अर्थव्यवस्था ही कृषिप्रधानतेकडून औद्योगिक आणि सेवा क्षेत्रावर निर्भर होण्याच्या संक्रमण अवस्थेत आहे. त्या कारणाने अवर्षणाचा आणि कृषि उत्पादनाचा संबंध पूर्वी इतका दृढ राहिलेला नाही. अवर्षणाच्या वर्षात अन्नधान्याचे किंवा एकूण कृषि उत्पादन एकदम कोसळत नाहीं. किंबहुना गेल्या ५–७ वर्षातील अन्नधान्य उत्पादनाची आकडेवारी तपासल्यास असे लक्षात येते की ते १३० दशलक्ष टनावरून १६० दशलक्ष टन या दिशेने वाढतेच आहे. अवर्षणामुळे होणारी वाढ मंद होते. ढोबळमानाने १९८० पासून ८९ पर्यंत आकडेवारी घेतल्यास ती सरासरी १५० दशलक्ष टनाहून जास्तच आहे. त्यापूर्वी १९७० मध्ये अन्नधान्याचे उत्पादन ११० ते १३०

दशलक्ष टन या मर्यादेतच कमी अधिक असे. १९८० च्या दशकात त्याची मर्यादाही १४५ ते १७० अशी झालेली दिसते. यावरून हे निश्चितपणे लक्षात येते की जलसिंचनाच्या अधिक सोयी, खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर, संकरित व सुधारित बियाणांचा वापर तसेच हरितक्रांतीत समाविष्ट होणाऱ्या सर्व प्रकारच्या तांत्रिक सुधारणा यांच्या योगे देशाचे कृषिउत्पादन वाढत असून जलसिंचनाच्या सोई ज्या राज्यांमध्ये अधिक प्रमाणात उपलब्ध आहेत अशी भारताची धान्य उत्पादन करणारी कोठारे उदा. पंजाब, हरियाना या राज्यांत ते अधिक वेगाने वाढते आहे.

गेल्या ३०–४० वर्षात आर्थिक प्रगतीची संरचना (Infrastructure) सक्षम आणि अधिक फलदायी झाली असल्याचे हे द्योतक आहे. उदा. गेल्या ३०–४० वर्षातील लहान, मध्यम, मोठी धरणे पाटबंधारे, लिफ्ट इरिगेशन कूपनलिका त्याचप्रमाणे परिवहन, संदेशवहन, कृषिविस्तार सेवा, वीज पुरवठा, रासायनिक खते, व्यापार, सहकार, भांडवल इ. सुविधांची रचना अधिक प्रमाणावर झाल्यामुळे शेती हा धंदा सर्वस्वी पावसावरील जुगार या स्वरूपाचा राहीलेला नाही.

वर्ष ८८–८९ मध्ये एकूण अन्नधान्यविषयक आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती वाढल्या नाहीत. त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात उत्पादित झालेल्या वस्तू आणि आदाने यांच्याही किमती बेतशीर वाढल्याने मागील दोन वर्षापेक्षा महागाईचा निर्देशांक सौम्य आहे. पण त्याचबरोबर अर्थसंकल्पीय तुटी आणि परदेशी व्यवहार तोटयातील गंभीर स्वरूपाच्या त्रुटी यामुळे अर्थव्यवस्थेची प्रकृती बिघडलेली आहे. म्हणूनच धोरणात्मक चुका आणि अर्थव्यवस्थेचे स्वास्थ्य या मधील परस्पर संबंध, नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक परिस्थिती यामधील संबंधापेक्षा, आता अधिक महत्त्वाचा झाला आहे हे लक्षात घेतले पाहिजे. गेल्या चार वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नातील प्रतिवर्षी वाढ १९८०–८१ या पायाभूत वर्षातील किंमतीची पातळी लक्षात घेता खालील प्रमाणे झाली आहे.

| वर्ष | ८५–८६ | ८६–८७ | ८७–८८ | ८८–८९ |
|---|---|---|---|---|
| | ५–१ | ३.८ | ३.६ | ३.९ |
| | | | | (अपेक्षित) |

म्हणजेच सातव्या पंचवार्षिक योजनेतील पहिल्या वर्षानंतर राष्ट्रीय उत्पादनातील वाढ सातत्याने कमीच झालेली आहे अपेक्षित इष्टांक ५ हा मिळू शकलेला नाही. ८५–८६ आणि ८६–८७ दोन वर्षात दुष्काळ व औद्योगिक घसरणीमुळे राष्ट्रीय उत्पादन घटले होते. ८८–८९ मध्ये परिस्थिती थोडीशी सावरत आहे. म्हणजेच सातव्या योजनेतील यश अपेक्षेइतके मिळू शकले नाही. योजनेमधील शेवटचेच वर्ष ८९–९० एवढेच बाकी राहीले आहे. त्यात काही अद्भूत प्रकारचा चमत्कार होऊन अर्थव्यवस्था एकदम सुधारेल अशी आशा करणे फोल आहे. शेतीच्या उत्पादनात ८६–८८ या दोन वर्षात मागील वर्षाच्या उत्पादनापेक्षा घटच होत गेली होती. चालू वर्षात मात्र त्यात लक्षणीय वाढ होणार आहे.

सातव्या पंचवार्षिक योजनेतील पहिल्या वर्षाचे अन्नधान्याचे उत्पादन १५०.४ दशलक्ष टन होते ते त्याच्या पूर्वीच्या वर्षापेक्षा २.४ दशलक्ष टनाने कमीच होते. योजनेच्या दुसऱ्या वर्षात त्यातली घट वाढून ते १४३.८ दशलक्ष इतके घसरले. ८७–८८ या वर्षात १३८.४ दशलक्ष टनाइतके कोसळले होते. चालू वर्षी ८८–८९ मध्ये १६६ दशलक्ष टनाइतके ते होईल असा अंदाज आहे. म्हणजेच ७ व्या योजनेच्या काळात शेतीच्या दृष्टीने उमेदीचे आणि बऱ्याच प्रमाणात यशस्वी झालेले हे एकमेव उत्साहवर्धक वर्ष आहे. कदाचित आगामी वर्षात म्हणजेच ८९–९० मध्ये पावसाने दोन्ही हंगामात साथ दिली तर सातव्या योजनेचे अन्नधान्य उत्पादनाचे १७० दशलक्ष टनाचे उद्दीष्ट सफल होईल अशी चिन्हे आहेत. कारण यंदा म्हणजे जून ८९ मध्ये मान्सूनची सुरवातच साधारणपणे मृगनक्षत्राच्या अलिकडेच दोन चार दिवस सुरू झाली असून हवामान खात्याच्या आणि डॉ. वसंत गोवारीकर यांच्या भाकीताप्रमाणे यंदाच्या वर्षातील पर्जन्यमानाचा अंदाज मनाला दिलासा देणारे आहेत.

औद्योगिक उत्पादनाचे ८५–८९ प्रतिवर्षी शेकडा वाढीचे आकडे पुढीलप्रमाणे आहेत.

| ८५–८६ | ८६–८७ | ८७–८८ | ८८–८९ |
|---|---|---|---|
| ८.७ | ९.१ | ७.५ | ९.३ |

८७–८८ हे अपवादात्मक वर्ष सोडले तर सातव्या योजनेत औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन वाढीचेप्रमाण समाधानकारक आहे. मागील वर्षापेक्षा चालू वर्षी विजेचे उत्पादन १.८ टक्क्याने वाढले आहे. घाऊक किंमतीचे निर्देशांक व त्यांच्यात होणारी प्रतिवर्षी

वाढ ही गेले चार वर्षे खालीलप्रमाणे आहे. १९८५–८६/३.८, ८६–८७/५.३, ८७–८८/१०.६, ८८–८९/५.० म्हणजेच महागाईचा निर्देशांक मागील वर्षापेक्षा खूप खाली आला आहे. एकूण चलनातील वाढ ही विचारात घेता असे लक्षात येते की ८५–८६ ची $M_3$ ची वाढ १५.९ होती. ती ८६–८७ १८.६ इतकी वाढली परंतु ८७–८८ मध्ये ती पुन्हा १५.९ वर येऊन ८८–८९ या वर्षात ती १५ टक्के इतकीच स्थिरावेल एकूण चलन पुरवठ्यावर नियंत्रणे सख्त असल्यामुळे चलनवाढ आटोक्यात राहिली आहे. निर्यात उत्पन्न वाढीचे आकडे खालीलप्रमाणे.

१९८५–८६ मध्ये –७.२ टक्के ८५–८७, १४.३ टक्के ८७–८८ मध्ये २६.४ टक्के ८८–८९ २०.४ टक्केवारीने निर्यात सातत्याने वाढत आहे असे दिसते तथापि ८८–८९ मध्ये मागील वर्षापेक्षा २७.४ टक्क्याने आयात वाढ झाली असल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार तोल प्रतिकूल झाला आहे. म्हणूनच गेल्या चार वर्षात परदेशी चलनाच्या राखीव शिलकीत फार मोठ्या प्रमाणात घट होत आहे. उदा. १९८५–८६ या वर्षी त्या शिलकी ७८२० कोटी रु.च्या होत्या. ८६-८७ मध्ये त्यात सुधारणा झाली. ८१५१ को. रु. ८७–८८ मध्ये ७६८७ कोटी रु. आणि चालू वर्षी त्या शिलकी फक्त ५९६७ कोटी रु इतक्याच राहतील. १९७७ मध्ये भारताजवळ ५ हजार कोटी रुपयांच्या शिलकी होत्या. इतक्या वर्षानंतर रुपयाचे आंतरराष्ट्रीय मूल्य घसरल्यामुळे तेवढ्याच शिलकी रक्कमेचे विद्यमान वास्तव मूल्य अति अल्प आहे.

एकूण देशी बचतीचा अभ्यास करताना मनाला अस्वस्थ करणारी बाब आहे ती म्हणजे १९८६–८७ मध्ये एकूण उत्पन्नाच्या २१.६ टक्के इतके बचतीचे प्रमाण होते ते ८७–८८ मध्ये २०.२ टक्के इतके कमी झाले आहे. ५–६ वर्षापूर्वी भारतातील हे प्रमाण किमान २३.२४ टक्के सातत्याने होते आणि ती परदेशी लोकांना आश्चर्य वाटण्यासारखी व भारतातील अर्थशास्त्रज्ञांना गर्व आणि समाधान वाटणारी घटना होती. दुसरी अस्वस्थ करणारी गोष्ट म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील भांडवल निर्मितीचे प्रमाणदेखील १.३ टक्याने घटले आहे ते प्रमाण २२.१ इतकेच राहिले आहे. एकूण भांडवल निर्मितीतील परदेशी भांडवलाचा भाग हा चालू वर्षी वाढलेलाच दिसतो ही बाब खटकते.

## निवडक आर्थिक निर्देशांक

मागील वर्षाच्या तुलनेने शेकडा वाढ वा घट

| | 1977-78 | 78-79 | 79-80 | 80-81 | 81-82 | 82-83 | 83-84 | 84-85 | 85-86 | 86-87 | 87·88 | 88-89 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण राष्ट्रीय उत्पादन मूल्य GDP (८०-८१ किमतीच्या पातळीने) | 8.7 | 5.8 | –4.7 | 7.4 | 5.9 | 2.6 | 8.0 | 3 9 | 5.1 | 3.8 | 3.6 | 3.9 |
| एकूण कृषि उत्पादन | 14.3 | 3.3 | –15.2 | 15.6 | 5,6 | –3.3 | 13.7 | 1.2 | 2.4 | –3.7 | –2 1 | 17.20 |
| धान्य उत्पादन | 13.7 | 4.3 | –16.8 | 18.1 | 2.9 | –2.8 | 17.6 | –4.5 | 3.4 | –4.7 | –3.5 | 20.23 |
| औद्योगिक उत्पादन | 4.2 | 7.2 | – 1.7 | 4.0 | 9.3 | 3.2 | 6.7 | 8.6 | 8.7 | 9.1 | 7.5 | 9.3 |
| वीज उत्पादन | 3.4 | 12.2 | 2.1 | 5.9 | 10.2 | 6.7 | 7.6 | 12.0 | 8.5 | 10.3 | 7.6 | 8.5 |
| घाऊक किमत निर्देशांक | 0.3 | 4.6 | 21.4 | 16.7 | 2.4 | 7.3 | 8.2 | 7.6 | 3.8 | 5.3 | 10.6 | 5.0 |
| $M_3$ | 18.4 | 21.9 | 17.7 | 18.1 | 12.5 | 16.1 | 18.1 | 18.9 | 15.9 | 18.6 | 15.9 | 15.0 |
| निर्यात | 5.2 | 5.9 | 12.1 | 4.6 | 16.3 | 12.8 | 11.0 | 20.2 | –7.2 | 14.3 | 26 4 | 24.4 |
| आयात | 18.7 | 13.1 | 34.2 | 37.3 | 8.4 | 5.0 | 10.8 | 8.2 | 14.7 | 2.8 | 10 9 | 27.4 |
| परदेशी चलन शिल्लक (कोटी रुपये) | 4862 | 5821 | 5934 | 5544 | 4024 | 4782 | 5979 | 7243 | 78.20 | 8151 | 7687 | 5967 |

## कृषिउत्पादन

१९८७–८८ या वर्षात हवामानखात्याने पावसाचे जे ३५ उपविभाग ठरविले आहेत, त्यातील २१ विभागात नेहमीच्या सरासरीपेक्षा खूप कमी आणि अपुरा पाऊस झाला. त्यामुळे त्या वर्षी खरीपाचे उत्पादन ९ टक्क्याने घसरले; मात्र रब्बी हंगामाचे २ टक्के उत्पादन वाढीच्या हातभाराने एकूण कृषिउत्पादन ८६ या वर्षापेक्षा उणे २.१ टक्के इतके घटले.

८८–८९ या वर्षात मात्र ३५ उपविभागांपैकी ३२ विभागांमध्ये सरासरीइतका किंवा त्यापेक्षा जास्त पाऊस झाला. त्यामुळे कृषिउत्पादन १७ ते २० टक्क्याने वाढेल आणि एकूण धान्य उत्पादन १७५ दशलक्ष टन म्हणजेच ७ व्या योजनेच्या इष्टांकाइतके होईल. गेल्या वर्षापासून केंद्राने ५ प्रमुख पीके म्हणजे तांदूळ, गहू, मका, तूर आणि हरबरा यांच्या उत्पादनासाठी हंगामपूर्व विस्तारसेवा, या पिकांना अनुकूल परिस्थिती असलेल्या देशातील निवडक १६९ जिल्ह्यात देण्याची खास योजना सुरू केली आहे. या पिकांकरता बियाणे खते पाणी आणि कर्ज सढळपणे उपलब्ध करण्यात आल्यामुळे चालू वर्षी देखील धान्योत्पादनात वाढ झाली.

एकूण १०.९ दशलक्ष हेक्टर जमीन नव्याने बागाईती क्षेत्रात सहाव्या योजनेच्या काळात आणावयाचे उद्दिष्ट होते. ७ व्या योजनेत ते उद्दिष्ट १२.९ दशलक्ष हेक्टरचे आहे.

रासायनिक खतांचा वापरही अलिकडे वाढला आहे. १९७०–७१ या वर्षी नायट्रोजन, फॉस्फेट्स आणि पोटॅश (NPK) यांचा भारतीय कृषीत एकूण २.१८ दशलक्ष टन एवढा वापर झाला. १९८०–८१ मध्ये NPK चा आकडा ५.५२ दशलक्ष टन होता. ८८-८९ या वर्षी हा आकडा ११.३३ दशलक्ष टन एवढा होईल.

### ७व्या योजनेतील कृषिउत्पादनाचे इष्टांक (Targets) आणि वास्तवात झालेले उत्पादन

(दशलक्ष टनांमधे/गठ्ठे)

| | १ ले वर्ष १९८५–८६ | | २रे वर्ष ८६–८७ | | ३रे वर्ष ८७–८८ | | ४थे वर्ष ८८–८९ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इष्टांक | वास्तव | इष्टांक | वास्तव | इष्टांक | वास्तव | इष्टांक | अपेक्षित |
| तांदूळ | 63.50 | 63.8 | 65.0 | 60.5 | 64.0 | 56.4 | 67.9 | 68.0 |
| गहू | 49.2 | 47.0 | 49.0 | 44.3 | 50.0 | 45.1 | 52.3 | 51.0 |
| ज्वारी बाजरी इ. | 33.0 | 26.2 | 32.0 | 26.8 | 32.0 | 25.8 | 33.0 | 34.0 |
| डाळी | 13.5 | 13.3 | 14.0 | 11.7 | 14.0 | 11.0 | 13.3 | 13.5 |
| तेलबिया | 13.6 | 10.8 | 14.8 | 11.2 | 14.0 | 12.3 | 15.6 | 14.5 |
| कापूस | 8.6 | 8.7 | 8.8 | 6.9 | 8.8 | 6.4 | 9.8 | 9.0 |
| ज्यूट | 8.6 | 12.6 | 8.5 | 8.6 | 8.6 | 6.7 | 9.2 | 7.0 |
| ऊस | 191.0 | 170.0 | 195.0 | 186.0 | 180.0 | 196.7 | 195.0 | 196.0 |

### टाळेबंदी आणि संप यामुळे वाया गेलेले श्रमदिवस

(दशलक्ष दिवस)

| | १९८५–८६ | ८६–८७ | ८७–८८ | ८८–८९ अपेक्षित |
|---|---|---|---|---|
| १ ली तिमाही | 8.03 | 7.9 | 7.4 | 6.5 |
| २री तिमाही | 6.8 | 6.0 | 10.3 | 5.1 |
| ३री तिमाही | 7.5 | 13.3 | 10.3 | – |
| ४थी तिमाही | 5.4 | 7.2 | 11.3 | – |
| एकूण | 27.8 | 34.5 | 39.4 | 11.7 |

औद्योगिक उत्पादनास आवश्यक असणारी जी कोळसा, वीज, पोलाद, सिमेंट, पेट्रोल ही पंचमहाभुते आणि परिवहन व संदेश वहनादि संरचनेचे पाठबळ लक्षात घेता, गेल्या तीन वर्षात त्यांचे उत्पादन व सेवा अनुकूलपणे लाभल्याकारणाने औद्योगिक उत्पादन गेल्या तीन वर्षात समाधानकारक आहे. जलविद्युत् उत्पादन अवर्षणामुळे घटले; तथापि औष्णिक वीजेने त्याची कमतरता पडू दिली नाही. रेल्वे व बंदरे यामध्ये मालाचा उठाव अधिक प्रमाणावर झाला. गेल्या ३–४ वर्षात प्रतिवर्षी सरासरी ३ लाख नवे फोन उपलब्ध झाले. सिमेंट आणि पोलाद यांची तसेच NPK (नायट्रोजन. फॉस्फेट, पोटॅश) यांची टंचाई नव्हती. एकूण औद्योगिकीकरणाची पाठराखण करणाऱ्या संरचनेने (Infra–struchure) उत्तम साथ दिल्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन मागील वर्षापेक्षा २ टक्क्याने जास्त म्हणजे ९ टक्के इतके वाढले आहे.

त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रातील खाणी व वीज या उपक्षेत्रातील प्रतिवर्षीची वाढ १९८१ ते १९८८ या काळात घटत असून फक्त निर्मिती (Manufacturing) उपक्षेत्रात उत्पादनवाढीची प्रवृत्ति स्थिर व प्रगत दिसते. निर्मितीक्षेत्रातही भांडवली वस्तू आणि उपभोग्य टिकाऊ वस्तू या गटातील निर्मितीचे १९८१–८८ या काळातील निर्देशांक अधिक प्रमाणावर वाढते आहेत. इतर गटातील उत्पादन मंद गतीने वाढले असे दिसते.

एकूण आजारी उद्योगांची संख्या सुमारे दीड लक्ष असून त्यांचेकडून थकलेली कर्जबाकी ५७०० कोटी रुपयांची आहे. आजारी उद्योगांचे ढोबळ प्रमाण शेकडा ४० ते ६० आहे. लघुउद्योग क्षेत्रात हे प्रमाण सर्वात जास्त आढळते. ८७–८८ या वर्षी संप आणि टाळेबंदी यायोगे वाया गेलेल्या श्रमदिवसांचा आकडा सुमारे ४ कोटी श्रमदिवस हा गेल्या ४ वर्षातील उच्चांक आहे. चालू वर्षात वाया जाणाऱ्या श्रमदिवसांची अपेक्षित संख्या २ कोटी इतकीच असेल. ७ व्या योजनेच्या गेल्या एकूण ४ वर्षात संप आदि कारणांनी एकूण १० कोटी श्रमदिवस वाया गेले आहेत. उत्पादकता आणि नफा यांवर होणाऱ्या अनिष्ट परिणामांबद्दल कुणालाच फारशी फिकीर नाही. याचे कारण सरकारी क्षेत्रे आणि खाजगी क्षेत्रातील बडे मक्तेदार यांना संपाची झळ बनू शकत नाही. झालेले नुकसान भरमसाट किंमती वाढवून वसूल करून घेणे हा त्यांच्या व्यवस्थापनाचा नित्याचा भाग झाला आहे. एकूण औद्योगिक उत्पादन समाधानकारक असले तरी देशाची उत्पादकता, गुणवत्ता आणि कार्यक्षमता या दिशेने कोणीही गंभीरपणे दखल घेण्यास सवड काढीत नाही ही सध्याची दुरवस्था आहे.

## किंमतपातळी आणि किंमतव्यवस्थापन

मागील वर्षाचा महागाईचा वार्षिक दर (Inflation WPI rate) १० टक्के होता. १९८८–८९ मध्ये तो ५ टक्क्या इतका खाली आला आहे. जीवनावश्यक वस्तूंचे योग्य वितरण, आयाती तसेच शिलकी राज्यातून मिळविलेले साठे, खाद्यतेले आणि डाळी याकरता केलेले विशेष प्रयत्न, ५ प्रमुख पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी देशभर सुमारे १७० जिल्ह्यात राबवलेली विस्तार–योजना, वर्षातील अनुकूल पीकपाणी, खरीप हंगामात झालेले विक्रमी उत्पादन (बंपर क्रॉप) नाफेड, फूड कॉर्पोरेशन, कॉटन कॉर्पोरेशन आणि राज्यस्तरावरील निगम यांनी शेती किंमतींना दिलेले सहाय्य व संरक्षण तसेच चलनवाढ व पतवाढ यांचे रिझर्व्ह बँकेने केलेले कठोर नियंत्रण आणि अर्थसंकल्पातील तुटीवर कमाल मर्यादा या विविध उपायांनी किंमतवाढीची प्रवृत्ति रोखण्यात आर्थिक व्यवस्थापनास यश मिळाले हे निश्चित.

## राजकोषीय नीति आणि चलननीति

अवर्षणोत्तर वर्षात एकूण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग भक्कमपणे वाढविणे हा गेल्या वर्षातील राजकोषीय नीतीचा गाभा आहे. कृषिप्रधान व्यवसाय, औद्योगिक भांडवली गुंतवणूकीस करातून सूट, निवडक व आवश्यक उद्योगांच्या आयात-करात सवलती तसेच निर्यात उद्योगांना प्रोत्साहन या धोरणांवर भर देण्यात आला आहे. केंद्रीय योजनांना भांडवल पुरविण्याकरता सरकारी उद्योगांचा ३९ टक्के सहभाग ४४ टक्क्यांइतका वाढविला असून, तुटीचा अर्थभरणा शक्य तितका कमी करण्याचा कसोशीने प्रयत्न चालू आहे. सरकारी तिजोरीतून व्याज देण्यावरचा बोजा १९८० मध्ये १० टक्के होता तो आता प्रतिवर्षी १७ टक्क्याइतका झाला आहे त्यामुळेच भांडवलनिर्मितीकरता सरकारी साधनांची तूट भासू लागली आहे. सरकारी क्षेत्रातील उपभोग्य (अनुत्पादन) खर्चाचे प्रमाण ७० टक्के परंतु $M_3$ मधील सरासरी वार्षिक वाढ जी १७ टक्के होती ती ८८–८९ या वर्षी १५ टक्क्या इतकी घटवण्यात यश मिळाले आहे.

**बाह्य क्षेत्र**

परदेशी चलनाची टचाई मात्र चालू वर्षी प्रकर्षाने भासत आहे. भारताचा परदेशी देण्याघेण्याचा एकूण आढावा प्रचंड तूट दाखवतो. व्यापारतोल देखील तुटीचा असून भांडवली देण्याघेण्याचा व्यवहार तोलही ढासळला आहे. एका बाजूस गेल्या ३–४ वर्षात अघळ-पघळ आयात धोरणामुळे आपली देणी बेसुमार वाढली आणि निर्यातीचे काही प्रमाणात अव्यवहार्य व काही बाबतीत केवळ मूर्खपणाचे धोरण असल्यामुळे निर्यात वाढूनही आपल्या परदेशी चलनाच्या उत्पन्नात त्या मानाने वाढ झालीच नाही. २१ व्या शतकाच्या ओढीने देशाच्या विकासाला वेग देण्याचे दृष्टीने न पेलतील इतकी कर्जे आपण घेऊन ठेवल्यामुळे सध्या दमछाक होत आहे. त्यामुळे भांडवली व्यवहार-तोलही बिघडला. परंतु त्याबद्दल अर्थशास्त्रज्ञ, रिझर्व्ह बँक, नियोजन मंडळ इत्यादींनी सरकारला सबूरीचा सल्ला दिला तरी त्याकडे बुद्धि पुरस्सरपणे दुर्लक्ष केले जात आहे याचे कारण देश आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असला तरी जोपर्यंत काही व्यक्ति आणि गट यांचे हितसंबंध सुरक्षित आहेत तोपर्यंत त्याबद्दल कुणी काही टीका करणे हे 'मूर्खापुढे वाचली गीता' इतके निरर्थक आहे. सामान्यतः उच्चपदस्थ आणि सर्वाधिकारी व्यक्ति स्वतःच्या खाजगी मालमत्ता, ऐषाराम सामर्थ्य आणि चैन यात मशगुल असतात त्यावेळी साम्राज्ये, संस्थाने, जहागिरी त्याचप्रमाणे देशही दिवाळखोरीच्या मार्गे नष्ट होतात असा इतिहासाचा दाखला आहे. देशाची आर्थिक स्थिति बिकट असता निदान देशातील धुरीणांच्या वाटचाला आर्थिक समृद्धि व भरभराट आहे ही एक जमेची बाजू आहे !

□

Tel : 42 05 89

**Popular Watch Co.**

854, New Budhwar Peth, Laxmi Road, Near City Post,
Pune 411 002.

**: Dealers in :**
**All types of Wrist Watches**

# अर्थसंकल्प १९८९–९० चे बजेट

तक्ता क्रं. १ (कोटी रुपये)

| | | 1987–88 प्रत्यक्ष (Actual) | 88–89 बजेट अनुमान | 1988–89 संशोधित अनुमान | 89–90 बजेट अनुमान |
|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 |
| 1) | महसुली प्राप्ती (Revenue Receipts) | 37226 | 42798 | 43135 | 52630 |
| 2) | कर प्राप्ती | 28015 | 31890 | 32652 | 38387 |
| 3) | करेतर प्राप्ती | 9211 | 10908 | 10908 | 14243 |
| 4) | भांडवली प्राप्ती | 22026 | 23278 | 24708 | 22194 |
| 5) | एकूण प्राप्ती | 59252 | 66076 | 67843 | 74824 |
| 6) | योजना बाह्य खर्च | 40869 | 47846 | 48877 | 54347 |
| 7) | महसुली खर्च | 36458 | 41936 | 42883 | 47875 |
| 8) | भांडवली खर्च | 4411 | 5910 | 5994 | 6472 |
| 9) | योजना खर्चासाठी (Plan Expenditure) | 24199 | 25714 | 26906 | 27814 |
| 10) | महसुली खर्चासाठी (on Revewe Account) | 9905 | 10704 | 11282 | 11767 |
| 11) | भांडवली खर्चासाठी (on capital Account) | 14297 | 15010 | 15624 | 16047 |
| 12) | एकूण खर्च (Total Expenditure) (6 + 9) | 65068 | 73560 | 75783 | 82161 |
| 13) | महसूली खर्च ( 7 + 10 ) (Revenue Expenditure) | 46343 | 52640 | 54165 | 59642 |
| 14) | भांडवली खर्च (Capital Expenditure) (8 + 11) | 18705 | 20920 | 21618 | 22519 |
| 15) | महसूली तूट (1–13) (Revenue Deficit) | 9137 | 9842 | 11030 | 7012 |
| 16) | एकूण एकत्रीत तूट (5–12) (overall Deficit) | 5816 | 7484 | 7940 | 7337 |
| | Increase in net RBI Credit to central Government रिझर्व्ह बँकेचे केंद्र सरकारला दिलेले निव्वळ कर्ज | 6559 | 7484 | 8200 | 7337 |

## एकूण खर्चाची टक्केवारी

| | | |
|---|---|---|
| केंद्रिय योजना (Central Plan) | 18 | टक्के |
| व्याज (Interest) | 18 | टक्के |
| संरक्षण (Defence) | 14 | टक्के |
| अन्य योजना बाह्य खर्च (Othe Non-Plan Expenditure) | 14 | टक्के |
| करांचे भाग (Share of Taxes) | 13 | टक्के |
| राज्य आणि संघराज्य क्षेत्र योजनेसाठी साहाय्य | 11 | टक्के |
| आर्थिक सहायता (Subsidies) | 9 | टक्के |
| योजना बाह्य खर्च (Non Plan Assistance) | 3 | टक्के |
| | 100 | टक्के |

**A Leading Bank in Co-operative Sector**

**with its EYES over SET on NEW HEIGHTS**

# Janata Sahakari Bank Ltd.

# Pune

**Scheduled Bank**

**1444, Shukrawar Peth,**
**Thorale Bajirao Road, Pune 411 002.**

PHONE 44 32 58

In the HUMBLE SERVICE of the CUSTOMERS with its
33 Branches and 3 Extension Counters spread
over 7 Districts of Mahasashtra.
Facility for Opening & Maintaining Non-Resident
(External) Accounts.

**H. N. Kunden**
Managing Director

**V. N. Sathe**
Chairman

# अर्थसंकल्प (८८-८९) चे सार-संकलन : टिप्पणी

मागील वर्षापेक्षा एकूण महसुली प्राप्तीत सुमारे १०,००० कोटी रुपयांची अपेक्षित वाढ व २५% वाढीची उडी या वर्षी अपेक्षित धरली आहे. त्यात करप्राप्तीतील सुमारे ७००० कोटी रु. आणि करेतर प्राप्तीतील ३००० कोटी अशी वाढ गृहीत धरली आहे. भांडवली प्राप्तीत मागील वर्षांच्या तुलनेने घट अपेक्षित धरली आहे. याचाच अर्थ, अर्थसंकल्पातील जमेत कर व करेतर प्राप्ती या वास्तव स्वरूपाच्या प्राप्तीवर भर दिलेला असून कर्जावर त्यामानाने कमी भिस्त आहे.

एकूण खर्चातदेखील मागील वर्षापेक्षा सुमारे ९५०० कोटी रुपयांची भर या वर्षी पडणार असून एकूण खर्चाच्या ८२,१६१ कोटी रुपयांच्या खर्चात योजनाबाह्य खर्चाकरता ५४,३४७ कोटी रु. खर्च होतील. प्रत्यक्ष विकास-खर्च एकूण २७,८१४ कोटी रुपये म्हणजे एकूण खर्चाच्या केवळ ३० टक्के एवढाच आहे. एकूण विकासखर्चातील भांडवली खर्च १७०४७ कोटी रुपयांचा होणार आहे ही समाधानाची बाब !

८८-८९ या वर्षीचा एकूण खर्च ८२१६१ कोटी रु. आहे तर प्राप्ती मात्र ७४,८२४ कोटी रुपयांची असल्यामुळे एकूण अर्थसंकलीय तूट सध्यातरी ७३३७ कोटी रुपयांची मर्यादित ठेवली आहे. परंतु वर्षअखेर वास्तवात ती तूट वाढेलच यात शंका नाही.

एकूण अर्थसंकल्पीय प्राप्तीतील २४ टक्के प्राप्ती उत्पादनकर, १९ टक्के सीमा कर (customs), १४ टक्के करेतर प्राप्ती अशी एकत्र केल्यास एकूण प्राप्तीच्या ५६ टक्के भाग फक्त अप्रत्यक्ष करांचाच आहे. प्रत्यक्ष करांमुळे अपेक्षित प्राप्ती फक्त ११ टक्केच आहे त्यातील आयकराचा भाग केवळ ५ टक्के आणि निगम कराचाही तितकाच आहे. आपल्या देशातील आयकराचे एकूण प्राप्तीतील स्थान व कार्य दिवसेंदिवस नगण्य स्वरूपाचे होते आहे. आणि अप्रत्यक्ष करांमुळे आपले विकास-नियोजन हे सर्वसामान्य गरीब लोकांनी सरकारी हौशीमौजी करता खिशाला चाट देऊन केलेले लोकनियोजन (People's plan) आहे. श्रीमंत वर्गावरील या नियोजनाचा भार इतका हलका आहे की, त्यामुळे आपल्या देशातील गरीब जनतेला समाजवाद चतन्यमय ठेवण्याकरता, श्रीमंतांवरील ताण कमी करावा लागत आहे. एकूण प्राप्तीपैकी १३ टक्के देशी कर्ज, ४ टक्के विदेशी कर्ज म्हणजेच १/५ हिस्सा कर्जाचा आहे. देशातील नव्या मिळवलेल्या १ रुपयांपैकी २० पैसे कर्ज म्हणून घ्यायचे आणि १८ पैसे मुद्दलाचे व्याज द्यावयाचे असा आपला हिशोब आहे. यातून मुद्दल जेव्हा फिटेल तेव्हा फिटेल; २१ वे शतकावर आपली सारी मदार आहेच !

एकूण खर्चापैकी १८ टक्के व्याज, १४ टक्के संरक्षण खर्च, १४ टक्के विकासेतर खर्च, ९ टक्के सहाय्यक अनुदाने हे एकत्र केल्यास ५५ टक्के खर्च, अनुत्पादक बाबींवर असून, राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यातील २४ टक्के खर्ची पडणार असल्यामुळे त्या खर्चांच्या मंजुरीचे निर्णय घेताना राजकीय लाभ-हानीचा विचार केला जाईल. उर्वरित केंद्रीय योजना-खर्चाकरिता फक्त १८ टक्के देऊ केले आहेत. याही अर्थसंकल्पात, विकासेतर आणि अनुत्पादक खर्चाचे प्रमाण विकास-खर्चाच्या प्रमाणापेक्षा फार मोठे आहे. ही प्रवृत्ती टाळण्यासाठी अर्थव्यवस्थापकीय शिस्तीची गरज आहे. परंतु सरकारची शक्ति, सामर्थ्य व अस्तित्व या सरकारच्या एकूण खर्चावरच निर्भर असल्याकारने यावाबतीत नाजूक हितसंबंधाच्या मर्यादा निर्माण झाल्या आहेत.

केंद्रीय योजना-खर्चापैकी (एकूण ३४,४४६ कोटी रु.) सर्वात जास्त खर्च उर्जेवर आहे. (११,२२७ कोटी त्या खालोखाल परिवहनावर ६२९६ कोटी रु. आणि उद्योग आणि खजिनांवर ५९३४ असे मोठे आकडे आहेत.

शेतीवर फक्त १२० कोटी रु. म्हणजेच एकूण खर्चापैकी फक्त तीन टक्के खर्च असून ग्रामीण विकासाकरता १८६२ कोटी रुपये उपलब्ध होतील. जलसिंचन आणि पूर-नियंत्रणाकरता फक्त २०५ कोटी रुपयांची तरतूद आहे.

सामाजिक सेवांकरता मात्र ३३९६ कोटी रुपयांची योजना केली असून संदेशवहनासाठी २८५८ कोटी रुपयांची मोठ्या प्रमाणावर तरतूद केली आहे. देशातील ग्रामीण जनतेला प्रत्यक्ष शेती व रोजगार पुरविण्यापेक्षा दूरदर्शन, संदेशवहन, मनोरंजन, निवडणुकांपूर्वीचे सामान्य मतदारांना करावयाचे शिक्षण(!) आणि इतर आकर्षक प्रदर्शन या राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या बाबींवर भर देण्याचे चातुर्य उत्तम आहे ! विज्ञान-तंत्रज्ञान पर्यावरण याकरता ७५२ कोटी रुपये उपलब्ध केले जातील. परंतु वैज्ञानिक प्रगतीबरोबरच त्या प्रगतीविषयक बोलबाला तसेच दूरदर्शनावरून त्या प्रगतीबद्दल देण्यात येणाऱ्या दृश्य वार्तामुळे देशातील सर्वसामान्यांचा आत्मविश्वास वाढविण्यावर भर देण्यासही आमचे संदेशवहन (communicationas) खाते चुकणार नाही अशी व्यवस्था चोख आहे !!

हार्दिक शुभचिंतन !

'समृद्धीसाठी सहकारी'

# श्री सुवर्ण सहकारी बँक लिमिटेड

७५९/५१, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४

फोन : ३३४५२८, ३३८१५४, ३३५९२५

अन्य शाखा

जोगेश्वरी : फोन : ४४६५१९

टिळक रोड : फोन : ४४२६४८

शनिवार पेठ : फोन : ४३६५८०

कर्वे रोड : फोन : ३३३९६९

श्रीपूर : फोन : ५७, ८४

कामाच्या वेळा

मुख्य कचेरी : सकाळी ९ ते ११ संध्याकाळी ५-३० ते ७-३०

अन्य शाखा : सकाळी ९ ते ११ संध्याकाळी ५ ते ७

बुधवार साप्ताहिक सुट्टी.

रविवार : सकाळी ९ ते ११

सौजन्यशील सेवा म्हणजेच सुवर्णसेवा

# ८ वी योजना

## (कच्चा मसुदा) अद्ययावत आकडेवारी जून ८९

नियोजन मंडळाने ८ व्या योजनेचा धोरणात्मक कच्चा मसुदा (Approach paper) नुकताच सादर केला आहे. १९८८–८९ च्या किमती गृहीत धरून ८ व्या योजनेचा संपूर्ण खर्च ६,४५,००० कोटी रुपये अपेक्षित आहे. ७ व्या योजनेचा एकूण खर्च १९८४–८५ च्या किमती गृहीत धरून ३,४८,१४८ कोटी रुपये झाला होता.

| | ८ वी योजना | ७ वी योजना |
|---|---|---|
| एकूण खर्च | ६,४५,००० को. रु. | ३,४८,१४८ को. रु. |
| सरकारी क्षेत्र | ३,४५,००० को. रु. | २,००,००० को. रु. |
| खाजगी क्षेत्र | ३,००,००० ,, | १४,८,१४८ को. रु. |
| गुंतवणूकी | ३,००,००० ,, | |
| चालू खर्च | ५०,०० ,, | |

म्हणजे, ढोबळपणे ७ व्या योजनेच्या तुलनेने ८ व्या योजनेचा एकूण खर्च दुप्पट असून सरकारी क्षेत्राच्या खर्चाचे एकूण खर्चाशी प्रमाण सुमारे ५४ टक्के आहे. खाजगी क्षेत्रातील अपेक्षित गुंतवणूक व खर्च मागील योजनेपेक्षा दुप्पट गृहीत धरला आहे.

८ व्या योजनेत विकास दराचा वार्षिक वेग ६ टक्के इतका अपेक्षित धरला आहे. परंतु ७ व्या योजनेतील ५ वर्षात तो सरासरी ३.५ ते ४ टक्केच राहिला आहे ही वस्तुस्थिति दुर्लक्षून चालणार नाही. म्हणून ६ टक्के दर हा मनाला केवळ भावणारा, भ्रामक आणि महत्त्वाकांक्षी वाटतो. एकूण रोजगारवाढीचा वार्षिक दर ३ टक्के आणि दारिद्र्य निर्मूलताचा दर २० टक्के ह्या दोन्ही अपेक्षा केवळ आग्रही 'आशावादी' आहेत भांडवल-उत्पादन प्रमाण ७ व्या योजनेत ४.६ होते. ८ व्या योजनेत ते ४.३ इतके घसरेल असे योजनाकारांनी मान्य केले आहे. दरडोई धान्य पुरवठा प्रतिवर्षी १९४ किलो हा इष्टांक किमान गरजा पूर्तीसाठी गृहीत धरला असून इ. स. १९९५ पर्यंत देशातील साथीचे भयानक रोग पूर्णपणे नाहीसे करावयाचा संकल्प केला आहे.

### एकूण बँक ठेवी–

२८ सरकारी क्षेत्रातील बँकांच्या एकत्रित ठेवी ७४,५३६ कोटी रुपये २५ डिसेंबर, १९८७ रोजी होत्या. ३० डिसेंबर, १९८८ रोजी त्या ठेवीत ८८,६९४ कोटी इतकी म्हणजे सुमारे २० टक्के वाढ झाली आहे. एकूण ठेवींपैकी केवळ स्टेटबँक समूहाच्या ठेवी ३८,५१३ कोटी रु. असून इतर राष्ट्रीकृत बँकांच्या ठेवीची रक्कम ५०,१८१ कोटी रु. आहेत. राष्ट्रीकृत बँकामधील ठेववाढीचे प्रमाण स्टेट बँकेपेक्षा जास्त आहे. ३० डिसेंबर १९८८ रोजी, बँकांच्या ठेवींनुसार क्रमवारी खालीलप्रमाणे :

१ ला क्रमांक–पंजाब नॅशनल बँक–१०,२१० कोटी रु.
२ रा ,, –सेंट्रल बँक – ९,१११ ,, ,,
३ रा ,, –बँक ऑफ इंडिया – ८,४१३ ,, ,,
४ था ,, –कॅनरा बँक – ८,१७१ ,, ,,
५ वा ,, –बँक ऑफ बरोडा– ७,३८२ ,, ,,

### जवाहर रोजगार योजना–

१९८९–९० या वर्षी या योजनेन्वये एकूण खर्च २१०० कोटी रुपये होणार असून त्याची राज्यवार वाटणी खालीलप्रमाणे होईल.

१) उत्तर प्रदेश–४१७ कोटी रु. २) बिहार–३१२ को. रु ३) मध्य प्रदेश–२०७ को. रु. ४) प. बंगाल–१७४ को. रु. ५) महाराष्ट्र–१६७ को. रु. ६) गुजराथ–६४ को. रु. जिल्हा ग्रामीण विकास संस्थांना या योजनेकडून ६१० कोटी रुपयांचा १ ला हप्ता उपलब्ध झाला आहे.

### घाऊक किमतीचा निर्देशांक (WPI)

१९७०–७१ पायावर्ष मानल्यास ८८–८९ चा निर्देशांक ४६०.२ असून त्याने नवीन सर्वोच्च पातळीचे शिखर गाठले आहे. अन्नधान्ये, औद्योगिक वस्तू, कापड, कागद, कागदापासून तयार झालेल्या इतर वस्तू यांच्या किंमतीत गेल्या ९ महिन्यात खूप वाढ झाली असून धान्येतर वस्तू, रसायने, धातू सोडून इतर खनिज पदार्थ यांच्या किंमतीत घट झाली आहे.

### परदेशीचलन शिलकी–

एप्रिल ८८ च्या तुलनेने एप्रिल ८९ मध्ये भारताचे निर्यात उत्पन्न ३५.८ टक्क्याने वाढल्यामुळे परदेशी व्यापार तोलातील घट ३२० कोटी रुपयाइतकी कमी झाली असून परदेशी चलन शिलकीमध्ये ११८३ कोटी रुपयांची घट झाली आहे याचे कारण एकूण परदेशी व्यवहार तोल (भांडवल-खाते) लक्षात येता तुटीचा आहे. मे १९८९ मध्ये भारताजवळचा परदेशी चलन शिलकींचा साठा फक्त ५५७४ कोटी रुपयांचा आहे.

Regd. No. PNC 205 Licence to post without prepayment No. 61


**Leading Cooperative Bank in Serviec of Common Man**

# Rupee Cooperative Bank Ltd.

**( SCHEDULED BANK )**

**HEAD OFFICE : 2062, SADASHIV PETH, PUNE-411 030**

Blood is a Source of Energy to our Body whereas
'RUPEE BANK' is a soure of common Man's
Prosperity through your savings With us
Contact our Girgaon Branch or
any branch-15 Branches in
Pune City & District

| S. K. PATKI | V. K. GANGURDE | M. N. BHANDARE |
|---|---|---|
| General Manger | Vice-Chairman | Chairman |


सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशन व अरविंद समाज यांच्या मालकीचे हे मासिक संपादक व मुद्रक प्रा. कमलाकर परचुरे यांनी हरिहर मुद्रणालय, पुणे ३० येथे छापून १५, फर्ग्युसन कॅम्पस् पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.